भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

जा.क्र. ७५६/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक १०/११/२०१७

१) मोटारपंप ची चोरी. :–

दिनांक २/११/२०१७ ते ३/११/२०१७ चे १९.०० ते ११.०० वाजता. दरम्यान यातील फिर्यादी जयलाल रोशनलाल पटले वय ३८ वर्ष रा. साकळी याचे शेताला पाणी देण्याकरीता साकळी शेतशिवार येथे नाल्याचे किना–यावर लावलेले १.५ एचपी सिआरआय कंपनीची मोटार पंप किंमत ८४५०/–रुपयाची कोणीतरी अज्ञात चोरानी कुणीही नसल्याची संधी साधुन चोरून नेले. अशा फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम ३७९ भा.दं.वी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पो.हवा. मोहुर्ले पो.स्टे. तुमसर हे करीत आहेत.

२) भरधाव मोटार सायकलची पायदळ जाणा–या महिलेस धडक, महिलेचा मृत्यु .:–

दिनांक १४/१०/२०१७ चे ११.०० वाजता दरम्यान यातील मृतक ग.भा. ताराबाई गणपत गजभिये वय ६६ वर्ष रा. माडगी ही घराकडे पायी जात असतांना कोणीतरी अज्ञात आरोपी मोटार सायकल चालकाने त्याचे ताब्यातील मोटार सायकल ही हयगयीने निष्काळजीपणे चालवुन ताराबाई हीला माडगी येथे धडक मारून पळुन गेला. जखमी महीलेस उपचारा करीता मेयो हॉस्पीटल नागपुर येथे भरती केले असता उपचारा दरम्याण ती मरण पावल्याने पो.स्टे. तहसिल नागपुर येथे मर्ग क्र. ००/१७ कलम १७४ जाफौ. नोंद करण्यात आला. त्याचे कागदपत्र पोलीस स्टेशन अडयाळ येथे प्राप्त झाल्याने पोलीस स्टेशन अडयाळ येथे कलम २७९, ३३७, ३०४(अ) भा.दं.वी. सहकलम १८४,१३४ मो.वा. का. अन्वये नंबरी गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास स.पो.नि. किचक पो.स्टे. अडयाळ हे करीत आहेत.

३) पतीने पत्नीस विटाचा तुकडा मारून जखमी केल्याने पतीवर गुन्हा नोंद. :–

दिनांक ८/११/२०१७ चे १९.०० वा. दरम्यान यातील आरोपी व फिर्यादी हे पती पत्नी असुन घरगुती कारणा वरून भांडण करून यातील आरोपीने फिर्यादीचे डोक्यावर विटाचा तुकडा मारून जखमी केले. अशा डॉक्टरी रिपोर्ट व फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन अडयाळ येथे कलम ३२४ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पो.हवा. जाधव पो.स्टे. अडयाळ हे करीत आहेत. गुन्हयातील आरोपीस अटक करण्यात आली.

४) क्षुल्लक कारणावरून वडिल व मुलीस थापड बुक्यांनी तसेच काठीने मारहाण करून जखमी केले.

दिनांक ८/११/२०१७ चे १८.०० वा. दरम्यान यातील फिर्यादी व चारही आरोपी हे

मनिषा वय १४ वर्ष ही गाना म्हणत बोरींगवर पाणी भरण्यास गेली असता यातील आरोपी क्र. २ ते ४ यांनी " आम्हाला टोमणे मारते " असे म्हणुन फिर्यादीच्या मुलीला शिवीगाळ करून संगनमत करून थापड बुक्यांनी मारपीट केली व फिर्यादीने आरोपींना " माझ्या मुलीला कशाला मारता ? " असे म्हटले असता आरोपी क्रमांक १. नी शिवीगाळ करून काठीने फिर्यादीच्या उजव्या खांदयावर व उजव्या पायाच्या मांडीवर मारून दुखापत केली व फिर्यादीची मुलगी मनिषा हिच्या डाव्या हाताच्या खांदयावर मारहान केल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट व एमएलसी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन दिघोरी येथे कलम ३२५, ३२३,५०४,३४ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पो.हवा. कठाणे पो.स्टे. दिघोरी हे करीत आहेत.

५) आमरोड वर येणा–या जाणा–या वाहतुकीस व लोकांच्या जिवितास धोका निर्माण होईल अशा स्थितीत वाहन उभी करून मिळून आल्याने गुन्हा नोंद :–

अ) दिनांक ९/११/२०१७ चे १२.०० वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील मिनीडोर वाहन आमरोडवर येणा–या जाणा–या वाहुकीस व लोकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल अशा स्थितीत पेट्रोल पंप ठाणा बस स्थानक जवळ ऊभी करून मिळुन आल्याने सर तर्फे फिर्यादी पो.हवा. मनोहर रामटेके पो.स्टे. जवाहरनगर यांचे रिपोर्टवरून पोलीस स्टेशन जवाहनगर येथे कलम २८३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पो.हवा. रामटेके पो.स्टे. जवाहरनगर हे करीत आहेत.

ब) दिनांक ९/११/२०१७ चे १५.३० वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील कंटेनर वाहन आमरोडवर येणा–या जाणा–या वाहुकीस व लोकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल अशा स्थितीत पेट्रोल पंप ठाणा बस स्थानक जवळ ऊभी करून मिळुन आल्याने सर तर्फे फिर्यादी पो.हवा. मनोहर रामटेके पो.स्टे. जवाहरनगर यांचे रिपोर्टवरून पोलीस स्टेशन जवाहनगर येथे कलम २८३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पो.हवा. रामटेके पो.स्टे. जवाहरनगर हे करीत आहेत.

क) दिनांक ९/११/२०१७ चे १७.०० वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील टाटा मिनी ट्रक आमरोडवर येणा–या जाणा–या वाहुकीस व लोकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल अशा स्थितीत ऊभी करून मिळुन आल्याने सर तर्फे फिर्यादी पो.हवा. मनगटे पो.स्टे. कारधा यांचे रिपोर्टवरून पोलीस स्टेशन कारधा येथे कलम २८३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पो.हवा. मनगटे पो.स्टे. कारधा हे करीत आहेत.

६) अवैध दारू अड्डयांवर धाडी . :–

दिनांक ९/११/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोलीस स्टेशन कारधा, सिहोरा व पवनीयेथील अवैध दारू अड्डयांवर धाडी घालुन एकुण ४ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन २५ लिटर हातभट्टी दारू किंमती १,७००/–रूपया चा माल तसेच १५ लिटर ३०० मि.ली. देशी दारू किंमत ४४१०/– रुपयाचा माल असा एकुण ६,११०/– रुपया चा माल जप्त करण्यात आला.

**७) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :–**

दिनांक ९/११/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण १०९ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी अवैध प्रवाशी ०५ तीन सिटर वाहनांवरती १५ केसेस व ईतर वाहनांवरती ८९ केसेस करण्यात आलेले आहे.

(एस. व्ही. कुलकर्णी )
पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ९९८७३८५४०५

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.